मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त 'मराठवाडा भूषण' पुरस्कारांचे वितरण!

## पाणी, रोजगार अन् उच्च शिक्षणाच्या प्रश्नांवर जोरदार मंथन; विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान

» पिंपरी | प्रतिनिधी

**मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून मराठवाडा जनविकास संघ आणि मराठवाडा मुक्तिसंग्राम महोत्सव समितीच्या वतीने काळेवाडी येथे 'मराठवाडा भूषण' पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात आला. तसेच मराठवाड्याच्या विकासातील पाणी, सिंचन, रोजगार, उच्च शिक्षण आणि स्थलांतराच्या प्रश्नांवर विचारमंथन करण्यात आले.**




धनाजीराव येळकर पाटील यांनी मराठवाडा मुक्त होऊन ७८ वर्षे उलटूनही या प्रदेशासमोरील अनेक मूलभूत प्रश्न कायम असल्याकडे लक्ष वेधले. सिंचनाचा अनुशेष, पाणीटंचाई, उद्योगधंद्यांचा अभाव आणि रोजगाराच्या मर्यादित संधी यामुळे मराठवाड्यातील नागरिकांना शिक्षण, व्यवसाय आणि रोजगारासाठी इतर शहरांकडे स्थलांतर करावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले. पाण्याची उपलब्धता वाढल्याशिवाय औद्योगिक विकासाला अपेक्षित गती मिळणार नाही आणि त्याचा परिणाम दरडोई उत्पन्नावरही होत असल्याचे त्यांनी नमूद केले. मराठवाड्यातच रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी उद्योगांना चालना देणे, उच्च शिक्षणाच्या सुविधा वाढविणे आणि युवकांसाठी कौशल्याधारित प्रशिक्षण उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या परिस्थितीमागे स्थानिक नेतृत्वाचे अपयश असल्याची टीकाही त्यांनी केली.

अरुण पवार यांनी आपल्या प्रास्ताविकात मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या इतिहासाला उजाळा देत या लढ्यात स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण केले. मराठवाडा मुक्तिसंग्राम हा केवळ इतिहासातील एक अध्याय नसून स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि लोकशाही मूल्यांसाठी दिलेल्या संघर्षाची प्रेरणादायी गाथा असल्याचे त्यांनी सांगितले. या संघर्षातून प्रेरणा घेऊन आजच्या पिढीने मराठवाड्याच्या विकासासाठी सामाजिक बांधिलकीने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन सकारात्मक भूमिका घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

डॉ. गणपतराव मोरे यांनी मराठवाड्याच्या विकासात शिक्षण क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. शिक्षणामुळे व्यक्तीच्या आयुष्याला दिशा मिळते आणि शिक्षित समाजातूनच व्यापक सामाजिक परिवर्तन घडू शकते. त्यामुळे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, कौशल्यविकास आणि रोजगाराभिमुख शिक्षणाच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या मागास भागातील विद्यार्थ्यांपर्यंत या सुविधा पोहोचविण्यावर विशेष भर देण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

भाऊसाहेब जाधव यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागामुळे आजची पिढी स्वातंत्र्याचा श्वास घेत असल्याचे सांगितले. या गौरवशाली इतिहासाची जपणूक करून तो पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. केवळ शासनाच्या प्रयत्नांवर अवलंबून न राहता समाजातील विविध घटकांनी एकत्रितपणे मराठवाड्याच्या विकासासाठी योगदान देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. सकारात्मक शक्तींना एकत्र आणून विकासाचा नवा मार्ग निर्माण करण्याची गरज असल्याचेही जाधव यांनी सांगितले.

डॉ. विवेक मुंगळीकर यांनी सामाजिक बांधिलकीचे महत्त्व अधोरेखित केले. समाजाच्या विकासासाठी प्रत्येक व्यक्तीने आपली जबाबदारी ओळखून योगदान देणे आवश्यक आहे. मराठवाड्यातील युवकांमध्ये मोठी क्षमता असून, त्यांना योग्य मार्गदर्शन, शिक्षण आणि संधी मिळाल्यास विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करू शकतात, विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### 'मराठवाडा भूषण' पुरस्काराने मान्यवरांचा गौरव

कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांना 'मराठवाडा भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उद्योग क्षेत्रातील योगदानाबद्दल विक्रम डेव्हलपर्सचे विक्रम गायकवाड यांचा गौरव करण्यात आला. सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल स्नेहवन संस्थेच्या अर्चना देशमुख, अभिषेक इलेक्ट्रिकल्स व कन्स्ट्रक्शनचे दयानंद बळकटे यांना सन्मानित करण्यात आले.

# गणेशम फेज-२ मध्ये आगीचा भडका; दोन मुलींची सुटका!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपळे सौदागर येथील गणेशम फेज-२ सोसायटीमध्ये आज (दि. १८) अचानक आग लागल्याने खळबळ उडाली. आगीत एका घरात दोन लहान मुली अडकल्या होत्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने बचावकार्य हाती घेत दोन्ही मुलींना सुखरूप बाहेर काढले. जवानांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला.**



आगीची माहिती मिळताच स्थानिक नगरसेवक नाना काटे आणि नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीची पाहणी करत त्यांनी अग्निशमन दलाशी संपर्क साधून बचावकार्य लवकर सुरू होण्यासाठी आवश्यक समन्वय साधला. आगीची तीव्रता लक्षात घेता परिसरातील नागरिकांमध्येही काही काळ घबराट निर्माण झाली होती.

काही वेळातच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. घरामध्ये दोन लहान मुली अडकल्या असल्याची माहिती मिळताच जवानांनी क्षणाचाही विलंब न करता बचावकार्य सुरू केले. धुराचे लोट आणि आगीची परिस्थिती असतानाही जवानांनी धाडसाने घरात प्रवेश करून दोन्ही मुलींना सुरक्षितपणे बाहेर काढले. त्यामुळे कुटुंबीयांनी आणि उपस्थित नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी युद्धपातळीवर आग विझविण्याचे काम सुरू केले. आगीवर नियंत्रण मिळविताना ती इमारतीतील इतर घरांमध्ये किंवा परिसरात पसरू नये, यासाठी जवानांनी विशेष खबरदारी घेतली. अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात आली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दरम्यान, आग नेमकी कोणत्या कारणामुळे लागली, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती मिळालेली नाही. संबंधित यंत्रणांकडून आगीच्या कारणाचा तपास सुरू आहे. अग्निशमन दलाच्या जवानांनी दाखविलेली तत्परता, धाडस आणि वेगवान बचावकार्य यामुळे दोन मुलींचे प्राण वाचले आणि संभाव्य मोठी दुर्घटना टळली. या कामगिरीबद्दल नागरिकांनी अग्निशमन दलाच्या जवानांचे कौतुक केले.

# अण्णांच्या भेटीत लांडगेंना आशीर्वाद; 'हिंदुभूषण'चे कौतुक!

## राळेगणसिद्धीत जुन्या स्नेहाला उजाळा; लोकहिताच्या कामासाठी अण्णांचे मार्गदर्शन

**पिंपरी | प्रतिनिधी**

**आमदार महेश लांडगे यांनी राळेगणसिद्धी येथे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या आश्रमशाळेला सदिच्छा भेट देत त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. विविध सामाजिक आणि विकासात्मक विषयांवर चर्चा करत त्यांनी अण्णांचे आशीर्वाद घेतले. यावेळी 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' प्रकल्पाबाबत माहिती देताना अण्णा हजारे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.**



आमदार महेश लांडगे यांचे वडील वस्ताद किसनराव लांडगे आणि ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्यात अनेक वर्षांपासून स्नेहाचे आणि जिव्हाळ्याचे संबंध आहेत. किसनराव लांडगे हे अण्णा हजारे यांच्या भेटीसाठी राळेगणसिद्धी येथे नियमितपणे जात असत. या भेटीगाठींमधून लांडगे आणि हजारे कुटुंबीयांमध्येही आपुलकीचे संबंध निर्माण झाले आहेत. त्यामुळे महेश लांडगे यांच्या राळेगणसिद्धी भेटीदरम्यान जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. कुटुंबीयांमधील जुना स्नेह आणि सामाजिक कार्याच्या निमित्ताने झालेल्या संवादाच्या आठवणी यावेळी चर्चेत आल्या.

पिंपरी-चिंचवडमध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' हा महत्त्वाकांक्षी स्मारक प्रकल्प साकारण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे. या प्रकल्पाची संकल्पना, सुरू असलेली कार्यवाही, स्मारकाची वैशिष्ट्ये आणि भावी पिढ्यांसाठी या प्रकल्पाचे ऐतिहासिक महत्त्व याबाबत लांडगे यांनी अण्णा हजारे यांना सविस्तर माहिती दिली. छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, त्याग, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने या स्मारकाची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. या भव्य स्मारकाच्या उभारणीबाबत अण्णा हजारे यांनी कौतुकाची भावना व्यक्त केली.

अण्णा हजारे यांच्या दीर्घ सामाजिक कार्याचाही यावेळी उल्लेख झाला. ग्रामविकास, व्यसनमुक्ती, स्वच्छ प्रशासन, पारदर्शकता आणि भ्रष्टाचारविरोधी जनजागृती यासाठी अण्णांनी केलेले कार्य समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे महेश लांडगे यांनी सांगितले. सामाजिक प्रश्नांवर सातत्याने भूमिका घेणाऱ्या अण्णांचे विचार आणि मार्गदर्शन लोकहिताच्या कामासाठी प्रेरणा देणारे असल्याचेही त्यांनी नमूद केले

अण्णांसोबत झालेल्या या भेटीत सामाजिक कार्य, विकासाचे विविध प्रश्न, तरुण पिढीसमोरील आव्हाने आणि समाजहिताच्या उपक्रमांबाबतही चर्चा झाली. अण्णांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन आपल्याला लोकहिताची कामे अधिक जोमाने करण्यासाठी नवी ऊर्जा देणारे असल्याची भावना आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली.

> "माझे वडील वस्ताद किसनराव लांडगे आणि आदरणीय अण्णा हजारे यांच्यात अनेक वर्षांपासून स्नेहाचे संबंध आहेत. त्यामुळे अण्णांसोबत आमचा कौटुंबिक जिव्हाळा निर्माण झाला आहे. राळेगणसिद्धी येथे भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली आणि आशीर्वाद घेतले. 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'च्या उभारणीचे अण्णांनी केलेले कौतुक आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे मार्गदर्शन लोकहितासाठी अधिक समर्पितपणे काम करण्याची नवी ऊर्जा देते."
>
> **-महेश लांडगे ,**
> **आमदार भोसरी विधानसभा.**

# भोसरी पीएमटी चौकातील १८ टपऱ्यांवर बुलडोझर; दारूअड्ड्यांना पोलिसांचा दणका!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पीएमटी चौक परिसरात अवैधरित्या दारू पिण्यासाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्या टपऱ्यांविरोधात भोसरी पोलीस आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेने संयुक्त कारवाई केली. १६ सप्टेंबर रोजी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत तब्बल १८ अवैध टपऱ्या हटविण्यात आल्या. या कारवाईमुळे परिसरातील अनधिकृत व्यवसाय आणि सार्वजनिक ठिकाणी मद्यपानाला प्रोत्साहन देणाऱ्या प्रकारांना चाप बसणार आहे.**





पीएमटी चौक हा भोसरीतील अत्यंत वर्दळीचा परिसर असून, या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा उभारण्यात आलेल्या काही पानटपऱ्या, खाद्यपदार्थांच्या टपऱ्या तसेच इतर छोट्या व्यावसायिक आस्थापनांच्या परिसरात मद्यपानाचे प्रकार सुरू असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे प्राप्त झाल्या होत्या. काही ठिकाणी टपऱ्यांच्या आडोशाला मद्यपान करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली जात असल्याचेही पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यामुळे परिसरातील नागरिक, महिला आणि वाहनचालकांना त्रास होण्याबरोबरच सार्वजनिक ठिकाणी अनुचित प्रकार वाढण्याची शक्यता निर्माण झाली होती. वर्दळीच्या ठिकाणी अशा प्रकारांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांनी कारवाईचे पाऊल उचलले.

या पार्श्वभूमीवर भोसरी पोलिसांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या संबंधित विभागाशी समन्वय साधून संयुक्त पथक तयार केले. १६ सप्टेंबर रोजी या पथकाने पीएमटी चौक आणि परिसरातील टपऱ्यांची पाहणी करत अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या तसेच अतिक्रमण करून व्यवसाय सुरू असलेल्या टपऱ्यांवर कारवाई केली. तपासणीदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एकूण १८ अवैध टपऱ्या निष्कासित करण्यात आल्या. या कारवाईमुळे परिसरातील अनधिकृत व्यवसायांना आळा बसण्यासोबतच टपऱ्यांच्या आडोशाने सुरू असलेल्या मद्यपानाच्या प्रकारांवरही नियंत्रण येण्याची शक्यता आहे.

दरम्यान, सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर मद्यपान करणाऱ्यांविरोधात भोसरी पोलिसांनी यापूर्वीपासूनच कारवाई सुरू ठेवली आहे. १ जानेवारी २०२६ पासून आजपर्यंत सार्वजनिक ठिकाणी मद्यपान केल्याप्रकरणी तब्बल १७९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून नागरिकांना त्रास देणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच अशा प्रकारांना प्रोत्साहन देणाऱ्या किंवा मद्यपानासाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्या घटकांवरही कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

भोसरी परिसरातील सार्वजनिक ठिकाणी मद्यपान, अनधिकृत व्यवसाय, अतिक्रमण तसेच नागरिकांना त्रासदायक ठरणाऱ्या इतर प्रकारांविरोधात यापुढेही सातत्याने विशेष मोहिमा राबविण्यात येणार आहेत. वर्दळीच्या चौकांमध्ये किंवा टपऱ्यांच्या परिसरात मद्यपानाचे प्रकार आढळल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता नागरिकांनी तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन भोसरी पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### कारवाईचा धडाका; १७९ गुन्हे दाखल!

पीएमटी चौक परिसरातील अवैध टपऱ्यांवर महापालिका आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई करत १८ टपऱ्या हटवल्या. सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्यांविरोधातही पोलिसांनी कारवाई तीव्र केली असून, १ जानेवारी २०२६ पासून आतापर्यंत १७९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिस आणि महापालिकेच्या संयुक्त कारवाईमुळे पीएमटी चौक परिसरातील अनधिकृत टपऱ्या आणि सार्वजनिक मद्यपानाच्या प्रकारांना आळा घालण्याच्या मोहिमेला वेग आला आहे.

# कोथरुडमध्ये 467 झाडांवर कुऱ्हाड; मनसेचा महापालिकेला घेराव!

## दोन दिवसांत ५० झाडांची कत्तल; नागरिकांच्या विरोधानंतर वृक्षतोड तात्पुरती थांबवली

**पिंपरी | प्रतिनिधी**

**कोथरूड येथील अॅव्हेन्यू सिटी प्राईडजवळ रस्ता रुंदीकरणासाठी तब्बल ४६७ झाडे हटविण्याची प्रक्रिया महापालिकेने सुरू केली आहे. गेल्या दोन दिवसांत ५० झाडे तोडण्यात आल्यानंतर स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध केला. त्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या प्रकरणात हस्तक्षेप करत तीन वर्षांपूर्वीच्या परवानगीच्या आधारे वृक्षतोड सुरू असल्याचा आरोप केला. सध्याची परवानगी दाखविण्याची मागणी केल्यानंतर वृक्षतोड तात्पुरती थांबविण्यात आली.**



कोथरूडमधील सर्व्हे क्रमांक १२/२ आणि १२/५ मधील रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. विकास आराखड्यात हा रस्ता रुंद करण्याचे नियोजन असून, रस्त्याच्या कामात अडथळा ठरणारी सुमारे ४६७ झाडे हटविण्याचे प्रस्तावित आहे. यापैकी १४९ झाडे पूर्णपणे तोडण्यात येणार असून, उर्वरित ३१८ झाडे काढून अन्य ठिकाणी पुनर्रोपण करण्याचे नियोजन आहे.

महापालिकेच्या पथ विभागाने यासाठी वृक्ष प्राधिकरण समितीकडून सप्टेंबर २०२३ मध्ये परवानगी घेतल्याचे सांगितले जाते. या जुन्या मंजुरीचा आधार घेत आता झाडे हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करून रस्ता रुंदीकरण करण्यास स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध केला आहे. वृक्षतोडीमुळे परिसरातील पर्यावरणावर परिणाम होण्याबरोबरच झाडांवर अवलंबून असलेल्या पक्ष्यांचा अधिवासही धोक्यात येणार असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, मनसेचे प्रदेश सरचिटणीस हेमंत संभूस यांनी घटनास्थळी भेट देत नागरिकांची भूमिका जाणून घेतली. तीन वर्षांपूर्वी घेतलेल्या परवानगीच्या आधारे सध्या वृक्षतोड करता येते का, असा सवाल उपस्थित करत त्यांनी महापालिकेकडे सध्याची वैध परवानगी दाखविण्याची मागणी केली. वृक्ष कायद्यानुसार परवानगी मिळाल्यानंतर ठरावीक कालावधीत तिची अंमलबजावणी न झाल्यास ती कालबाह्य ठरते, असा दावा मनसेकडून करण्यात आला. या वृक्षतोडीविरोधात नागरिकांच्या बाजूने ठामपणे उभे राहणार असून, गरज पडल्यास आंदोलन करण्याचा इशाराही संभूस यांनी दिला.

स्थानिक नागरिक स्नेहल स्वामी यांनीही मोठ्या प्रमाणात झाडे तोडण्यास विरोध केला. रस्त्याच्या कामासाठी शेकडो झाडे तोडल्यास परिसराच्या पर्यावरणाचे मोठे नुकसान होईल. तसेच झाडांवर राहणाऱ्या पक्ष्यांचा अधिवास नष्ट होण्याची शक्यता असल्याने महापालिकेने तातडीने वृक्षतोड थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली.

मात्र, महापालिकेच्या पथ विभागाचे प्रमुख राजेश बनकर यांनी रस्ता रुंदीकरणाचे काम आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. विकास आराखड्यात हा रस्ता २४ मीटर रुंद असून, रस्त्यासाठी आवश्यक जागा महापालिकेच्या ताब्यात आली आहे. रस्ता रुंदीकरणामुळे करिष्मा सोसायटीकडे जाणारी वाहतूक सुरळीत होऊन परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक सर्व परवानग्या घेण्यात आल्या असून, त्यानंतरच काम सुरू करण्यात आले आहे, त्यामुळे विरोध करण्याचे कारण नसल्याचे बनकर यांनी सांगितले.

या प्रकरणामुळे कोथरूडमध्ये विकासकामासाठी होणारे रस्ता रुंदीकरण आणि त्यासाठी होणारी मोठ्या प्रमाणातील वृक्षतोड यावरून महापालिका आणि स्थानिक नागरिक आमनेसामने आले आहेत. त्यामुळे पुढील काळात या वृक्षतोडीबाबत महापालिका कोणती भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### ४६७ झाडे की रस्ता रुंदीकरण?

कोथरूडमधील वृक्षतोडीवरून महापालिका आणि नागरिक आमनेसामने आले आहेत. दोन दिवसांत ५० झाडे तोडल्यानंतर मनसेने हस्तक्षेप करत जुन्या परवानगीच्या आधारे वृक्षतोड सुरू असल्याचा आरोप केला. सध्याची वैध परवानगी दाखविल्याशिवाय पुढील वृक्षतोड करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

# ‘प्रकल्पबंबाळ’ पुणे; मेट्रोपासून ‘पाताळ लोक’पर्यंत योजनांचा धडाका!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पुणे महानगरातील जवळपास प्रत्येक भागात सध्या एखादा ना एखादा पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू आहे. काही प्रकल्प प्रत्यक्षात सुरू आहेत, काही लवकरच सुरू होण्याच्या टप्प्यात आहेत, तर काही अद्याप प्रस्तावित अवस्थेत आहेत. मेट्रो, बाह्य वर्तुळाकार मार्ग, अंतर्गत वर्तुळाकार मार्ग, उच्च क्षमता द्रुतगती वर्तुळाकार मार्ग (एचसीएमटीआर), ‘पाताळ लोक’ यांसह विविध प्रकल्पांची मोठी यादी तयार झाली आहे. मात्र, या प्रकल्पांची संख्या वाढत असताना पुणेकरांना भेडसावणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न अद्याप कायम आहे.**



पुण्याची लोकसंख्या सातत्याने वाढत असून, शहराचा विस्तारही वेगाने होत आहे. वाढत्या लोकसंख्येसोबतच रस्ते, सार्वजनिक वाहतूक, पाणी, सांडपाणी आणि इतर पायाभूत सुविधांचे नियोजन करणे आवश्यक होते. मात्र, गेल्या काही वर्षांतील परिस्थिती पाहता वाढत्या वाहनसंख्येच्या तुलनेत वाहतूक व्यवस्थेचे नियोजन अपुरे पडल्याचे चित्र आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवर दररोज होणारी वाहतूक कोंडी त्याचे ठळक उदाहरण ठरत आहे. वाहनांची संख्या वाढत असताना त्यासाठी आवश्यक पर्यायी मार्ग आणि सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वेळेत उभारणे अपेक्षित होते.

वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर होत गेल्यानंतर त्यावर तोडगा काढण्यासाठी विविध मोठ्या प्रकल्पांची घोषणा करण्यात आली. यामध्ये मेट्रो प्रकल्पाला विशेष महत्त्व देण्यात आले. सध्या वनाज ते रामवाडी आणि पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट या दोन मार्गिकांवर मेट्रो सेवा सुरू आहे. या दोन्ही मार्गांची प्रकल्पीय दैनंदिन प्रवासी क्षमता सुमारे सहा लाख इतकी आहे. मात्र, सध्या सुमारे अडीच लाख प्रवासी मेट्रोचा वापर करत आहेत.

मेट्रोचे जाळे विस्तारण्याचे कामही सुरू आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर या मार्गिकेवरील १२ स्थानकांदरम्यानची सेवा सुरू करण्यास मंजुरी मिळाली असली, तरी तिच्या उद्घाटनासाठी अद्याप मुहूर्ताची प्रतीक्षा आहे. त्याचबरोबर पिंपरी-चिंचवड ते निगडी आणि स्वारगेट ते कात्रज या मार्गिकांचे काम सुरू आहे. आगामी काळात रामवाडी ते वाघोली, खराडी ते खडकवासला आणि नळस्टॉप ते माणिकबाग या मार्गिकाही प्रस्तावित आहेत. मात्र, या प्रस्तावित प्रकल्पांना प्रत्यक्ष गती कधी मिळणार, हा प्रश्न कायम आहे.

याचवेळी पुणे महापालिकेने उच्च क्षमता द्रुतगती वर्तुळाकार मार्ग अर्थात एचसीएमटीआर प्रकल्पालाही गती देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. शहरातील प्रमुख मार्गांवरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी उन्नत मार्गाची संकल्पना या प्रकल्पात आहे. त्यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘पाताळ लोक’ या भुयारी मार्गाची घोषणा केली असून, त्याचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे.

विशेष म्हणजे एकाच वेळी मेट्रो, बाह्य वर्तुळाकार मार्ग, अंतर्गत वर्तुळाकार मार्ग, एचसीएमटीआर आणि भुयारी मार्ग अशा अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे नियोजन सुरू आहे. मात्र, यातील प्रकल्प पूर्ण होण्यास लागणारा कालावधी पाहता पुणेकरांना सध्याच्या वाहतूक कोंडीपासून तातडीने दिलासा मिळणार का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

या प्रकल्पांचे काम सुरू झाल्यानंतर ते सुमारे चार वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे प्रस्तावित कालावधीनुसार सर्व प्रकल्प मार्गी लागले तरी पुणेकरांना वाहतूक कोंडीतून पूर्ण दिलासा मिळण्यासाठी आणखी काही वर्षांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यामुळे घोषणा आणि आराखड्यांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष कामांना वेग देणे आणि प्रकल्प वेळेत पूर्ण करणे, हेच पुण्याच्या वाहतूक व्यवस्थेसमोरील मोठे आव्हान ठरणार आहे.

### रिंग रोड, एचसीएमटीआर अन ‘पाताळ लोक’ची भर

पुण्याच्या वाहतुकीचा भार कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून बाह्य वर्तुळाकार मार्गाचे काम सुरू आहे. या मार्गामुळे पुणे शहराच्या बाहेरील वाहतुकीला पर्यायी मार्ग उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. मात्र, या प्रकल्पाच्या कामालाही अपेक्षित वेग नसल्याचे चित्र आहे. दुसरीकडे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अंतर्गत वर्तुळाकार मार्गासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू केली आहे.

# शिरूरमध्ये हॉटेलचालकावर भरदिवसा गोळ्यांचा वर्षाव!

## दुचाकीवरून जात असताना दोघांनी जवळून केला गोळीबार; तरुणाचा उपचारांपूर्वीच मृत्यू!

**» पुणे | प्रतिनिधी**

**मद्याच्या बिलावरून झालेल्या जुन्या वादाचे पर्यवसान शिरूरमध्ये थेट गोळीबारात झाले. हॉटेल आणि बारचालक तरुणावर दोघांनी जवळून पिस्तुलातून गोळ्या झाडून त्याचा खून केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी सकाळी शिरूर शहरातील डॉ. आंबेडकरनगर परिसरात घडली. हल्ल्यानंतर दोन्ही आरोपी पसार झाले असून, त्यांच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हरी गंगावणे (वय ३४, रा. शिरूर, जि. पुणे) असे मृत हॉटेलचालकाचे नाव आहे. शिरूरमधील डॉ. आंबेडकरनगर परिसरात गंगावणे यांचे हॉटेल आणि बार आहे. शुक्रवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास ते मित्रासोबत दुचाकीवरून लोटे गल्ली परिसरातून जात होते. अरुंद गल्ली असल्याने दुचाकीचा वेग कमी होता. याचवेळी दोघे हल्लेखोर पायी तेथे आले आणि गंगावणे यांच्यावर जवळून पिस्तुलातून गोळीबार केला.

अचानक झालेल्या गोळीबारामुळे गंगावणे यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. ते आणि त्यांच्यासोबत असलेला मित्र दुचाकीसह खाली कोसळले. त्यानंतर गंगावणे यांच्या मित्राने हल्लेखोरांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मात्र, अरुंद गल्ल्यांचा फायदा घेत दोन्ही आरोपी तेथून पसार झाले.

गोळीबारात गंभीर जखमी झालेल्या गंगावणे यांना त्यांच्या मित्राने तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच शिरूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच गंगावणे यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले

बुधवारी रात्री गंगावणे परिसरातील एका मंडळाजवळ थांबले असताना आरोपी तेथे आला. त्याचा काका याच परिसरात राहत असल्याने पुन्हा दोघांमध्ये वाद झाला. त्यानंतर आरोपी तेथून निघून गेला. गंगावणे यांनी या घटनेची माहिती आरोपीच्या काकाला दिली. काकाने आरोपीशी संपर्क साधून त्याला सुनावल्याने तो आणखी संतापला होता, अशी प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली.

यानंतर शुक्रवारी सकाळी आरोपीने साथीदाराच्या मदतीने गंगावणे यांच्यावर पाळत ठेवून गोळीबार केल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. या घटनेनंतर शिरूर शहरात खळबळ उडाली असून, पसार झालेल्या दोन्ही आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी स्वतंत्र पथके रवाना केली आहेत.

### तीन महिन्यांपूर्वीपासून वादाची ठिणगी

पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत मद्याच्या बिलावरून झालेल्या जुन्या वादातून हा खून झाल्याची माहिती समोर आली आहे. पोलिस निरीक्षक विनोद पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमारे तीन महिन्यांपूर्वी मद्याच्या बिलावरून गंगावणे आणि आरोपीमध्ये वाद झाला होता. त्यावेळी गंगावणे यांनी एका आरोपीला मारहाण केल्याची माहिती आहे.

# शिवाजीनगरमध्ये धावत्या पीएमपी बसला अचानक आग!

**» पुणे | प्रतिनिधी**

**पुणे स्टेशन ते निगडी मार्गावर धावणाऱ्या पीएमपी बसला शुक्रवारी सकाळी शिवाजीनगर परिसरात अचानक आग लागल्याची घटना घडली. बसमधून मोठ्या प्रमाणात धूर निघत असल्याचे रात्रपाळीवरून घरी जाणाऱ्या अग्निशामक दलाच्या जवानाच्या लक्षात आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी क्षणाचाही विलंब न करता तातडीने अग्निशामक दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाला माहिती दिली. त्यानंतर स्वतः बसजवळ धाव घेत चालक, वाहक आणि बसमधील सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरविले. त्यामुळे आग भडकण्यापूर्वीच प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आल्याने मोठा अनर्थ टळला.**




अग्निशामक दलाच्या कसबा पेठ केंद्रातील जवान सुरेश पवार हे पिंपरी-चिंचवडमधील काळेवाडी परिसरात राहतात. शुक्रवारी सकाळी त्यांची रात्रपाळी संपल्यानंतर ते दुचाकीवरून घरी निघाले होते. शिवाजीनगर परिसरातून जात असताना पुणे स्टेशनहून निगडीच्या दिशेने जाणारी पीएमपी बस त्यांच्या निदर्शनास आली. बसमधून मोठ्या प्रमाणात धूर बाहेर येत असल्याचे त्यांनी पाहिले. सुरुवातीला बसमध्ये तांत्रिक बिघाड झाला असावा, असा अंदाज येत असतानाच धुराचे प्रमाण वाढत असल्याने पवार यांनी परिस्थितीचे गांभीर्य तातडीने ओळखले.

अग्निशामक दलातील जवान असल्याने अशा परिस्थितीत कोणती खबरदारी घ्यावी, याची त्यांना कल्पना होती. त्यांनी वेळ न दवडता अग्निशामक दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून बसला आग लागल्याची माहिती दिली. अग्निशामक दलाचा बंब घटनास्थळी पोहोचेपर्यंतचा वेळ महत्त्वाचा असल्याचे लक्षात घेऊन पवार यांनी स्वतःच पुढाकार घेतला. त्यांनी बस थांबवून चालक आणि वाहकाच्या मदतीने बसमधील प्रवाशांना तातडीने खाली उतरविण्यास सुरुवात केली.

बस त्यावेळी प्रवाशांनी भरलेली होती. त्यामुळे आग वाढल्यास परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता होती. मात्र, पवार यांनी प्रसंगावधान राखून प्रवाशांना घाबरून न जाता सुरक्षित ठिकाणी जाण्यास सांगितले. चालक आणि वाहकासह सर्व प्रवाशांना बसमधून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर बसपासून सुरक्षित अंतर राखून प्रवाशांना थांबविण्यात आले. त्यामुळे आग वाढण्यापूर्वीच संभाव्य जीवितहानीचा धोका टळला.

### जवानाच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला!

रात्रपाळी संपवून घरी जात असताना अग्निशामक दलाचे जवान सुरेश पवार यांच्या लक्षात पीएमपी बसमधून मोठ्या प्रमाणात धूर निघत असल्याचे आले. त्यांनी तातडीने अग्निशामक दलाला माहिती देत स्वतः बसमधील चालक, वाहक आणि सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढले. त्यानंतर घटनास्थळी दाखल झालेल्या अग्निशामक जवानांनी पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. पवार यांच्या सतर्कतेमुळे संभाव्य जीवितहानी टळली.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाचा बंब घटनास्थळी दाखल झाला. जवानांनी तातडीने आगीवर पाण्याचा मारा सुरू केला. काही वेळाच्या प्रयत्नांनंतर बसला लागलेली आग आटोक्यात आणण्यात आली. आग इतर वाहनांकडे किंवा परिसरातील भागात पसरण्यापूर्वीच ती नियंत्रणात आणण्यात अग्निशामक दलाला यश आले.

या घटनेत जवान सुरेश पवार यांनी दाखविलेली तत्परता विशेष ठरली. रात्रपाळी संपल्यानंतर घरी जात असतानाही त्यांनी आपल्या कर्तव्यभावनेतून परिस्थिती हाताळली. केवळ अग्निशामक दलाला माहिती देण्यापुरते न थांबता त्यांनी स्वतः घटनास्थळी धाव घेत प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढले. त्यामुळे अग्निशामक दलाचा बंब येईपर्यंत संभाव्य मोठी दुर्घटना टाळता आली.

आग नेमकी कोणत्या कारणामुळे लागली, याबाबतची माहिती पुढील तपासानंतर स्पष्ट होणार आहे. मात्र, बसमधून धूर निघत असल्याचे वेळीच लक्षात येणे आणि त्यानंतर जवान पवार यांनी घेतलेली तातडीची भूमिका यामुळे बसमधील प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. त्यांच्या प्रसंगावधानाचे पीएमपी प्रवाशांसह घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी कौतुक केले.